**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०५ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - गणेश लक्ष्मण शिंदे
वय - ४३ वर्षे
व्यवसाय - नोकरी पोहेकॉ ९५०
रा/ने - सोलापूर ग्रामिण पोलीस स्टेशन

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. दि. १९/०३/२०२५ रोजी माझी नेमणूक मालवण पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल या पदावर होती. सदर दिवशी गुन्हा रजि. क्र. ४२/२०२५ तपासाकरीता सोपविण्यात आला होता. आदेश मिळाल्यानंतर मी घटनास्थळाला भेट देवून घटनास्थळाचा पंचनामा केला. पंचनामाच्या वेळेस मी लाकडी दांडा जप्त केला. मला दाखविण्यात आलेला एमओ नं. १ तोच आहे. मी त्यानंतर पोलीस स्टेशन येथे जावून मुद्देमाल पावती फाडली. मला दि. २०/०३/२०२५ रोजीची मुद्देमाल पावती दाखविली. त्यावर माझी सही आहे. तसेच पोलीस स्टेशनचा शिक्का आहे. त्यास नि.क्र. पी७/पीडब्ल्यू५ देण्यात येते. मी आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५ (३) प्रमाणे नोटीसा दिल्या. मी वैद्यकिय प्रमाणपत्र प्राप्त केले. मी साक्षीदारांचे तपास टिप्पण नोंदविले. आरोपींच्याविरुध्द सबळ पुरावा मिळाल्यानंतर मी त्यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीस दाखविल्यास मी त्यांना ओळखू शकतो. ते आज न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एस.के.जाधव यांचेमार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, सागरी महामार्ग हा वर्दळीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, सागरी महामार्गावर रात्रनदिवस वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, सागरी महामार्गावर कथीत घटनास्थळाचा आजूबाजूला लाईटची व्यवस्था नाही तसेच लाईटही नाही. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळाच्या जवळ राहती घरे व भंगारची दुकाने आहेत. हे म्हणणे खरे आहे की, एमओ नं. १ मी आरोपींच्या ताब्यातून हस्तगत केलेला नाही. मी सिंधुदूर्ग जिल्हयात अडीच ते तीन वर्षे काम केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला झाडांचे थोडे फार ज्ञान आहे. हे म्हणणे खरे आहे की, दांडा व काठी यामध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की,

दांडा हा भरीव व जाड असतो व काठी ही बारीक असते. हे म्हणणे खरे आहे की, एम.ओ नं. १ हा दांडा नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, एखादी फिर्याद घेताना व ती ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यास अर्धा ते पाऊण तास लागतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत केसमध्ये फिर्यादी रुग्णालया उपचार घेतले बाबतचा केसपेपर मी दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वैद्यकिय अधिकारी दि. २१/०३/२०२५ रोजी डयुटीवर हजर होते हे दाखविण्यासाठी मी कोणताही कागदोपत्री पुरावा दोषारोपपत्रासोबत दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वैदयकिय अधिकारी यांनी वैदयकिय प्रमाणपत्र कोणत्या तारखेलाप दिले त्या तारखेची नोंद वैदयकिय प्रमाणपत्रामध्ये केली जाते. साक्षीदाराला नि.क्र.पी४/पीडब्ल्यू३ दाखविण्यात आले. सदर प्रमाणपत्र मला दि. २१/०३/२०२५ रोजी प्राप्त झाले अशी नोंद त्या प्रमाणपत्रामध्ये आहे.

४. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची फिर्यादीकडून ओळख परेड करुन घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने आरोपीचे नाव देताना आरोपीचे नाव शुभम बांदकर असे नमूद केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी तपास करताना शुभम बांदेकर या नावाच्या व्यक्तीचा तपास केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, शुभम बांदकर व शुभम बांदेकर हा एकच व्यक्ती आहे हे दाखविण्यासाठी मी अभिलेखावर कोणताही पुरावा दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये शुभम बांदकरचा पल्सरवाला मित्र व भगत असे आरोपींचे नावे नमूद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींची शहानिशा करण्यासाठी मी फिर्यादीकडून आरोपींची ओळख परेड करुन घेतली नाही.

५. घटनेच्या वेळेस फिर्यादीने पोलीसांना फोन करुन घटनास्थळावर बोलविले व त्यानंतर पोलीस फिर्यादीला पोलीस स्टेशनला घेवून आले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीने पोलीसांना फोन करुन बोलाविले त्यानंतर पोलीस कथीत घटनास्थळावर पोचल्यानंतर फिर्यादीला त्यांच्यासोबत पोलीस स्टेशनला सोबत घेवून आले असे माझे तपासकामात निष्पन्न झालेले नाही.

६. फिर्यादीने दिलेली कथीत फिर्याद मी तपासकामी वाचून पाहिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये शुभम विलास बांदेकर हा माझ्या शेजारी राहणारा असल्याने मी त्याला ओळखतो ही बाब नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, दि. १९/०३/२०२५ रोजी शुभम बांदेकर अक्षय भगत व लिलित भगत माझ्या गेटच्या समोर दारु पित होते असा मजकूर त्यांच्या फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, " फिर्यादमध्ये मी त्यांना दारु पित असलेबाबत विचारणा केली असता ते मला मारण्यासाठी अंगावर धावून आले असे त्यांच्या फिर्यादमध्ये नमूद नाही'' . हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादमध्ये '' मी पोलीसांना जबाब देताना शुभम बांदेकर यांनी दांडयाने माझ्या डोक्यावर मारले व अक्षय भगतने हाताने पाठीवर मारले आणि ललित भगत याने देखील डाव्या हातावर मारले '' हा मजकूर नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, '' मी पोलीसांना बोलावून घेतले, पोलीस आल्याने ते तेथून पळून गेले " हा मजकूर देखील फिर्यादमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, वर नमूद फिर्यादीने केलेले कथन हे मला तपासामध्ये आढळून आलेले नाहीत.

७. हे म्हणणे खरे नाही की, मला गुन्हा रजि. नं. ४२/२०२५ चे तपासकाम सोपविण्यात आले, सदर तपासामध्ये मी घटनास्थळ पंचनामा केला, मुद्देमाल पावती फाडली, एम.ओ.नं. १ जप्त केले, आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्यानंतर त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/
एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.

दि. १०/०४/२०२६